# ...आणि भारत अमेरिकेला मागे टाकेल!



## सुधाकर प्रभू यांचे आश्वासक भाकीत

म. टा. प्रतिनिधी

आणखी तीस वर्षांनी-२०३५ साली भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाची, अमेरिकेपेक्षाही ताकदवान शक्ती असेल असे भाकीत गोल्डमन सॅक्स या जागतिक दर्जाच्या इन्व्हेस्टमेंट बँकिंग कंपनीने वर्तवले आहे. इंग्लंडमध्ये स्थायिक झालेले विख्यात वास्तुतज्ज्ञ सुधाकर प्रभू यांनी याचे स्मरण करुन देताच इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला आणि वातावरण धुंद झाले.

निमित्त होते, प्रभू यांच्या कंपनीस क्वीन्स ॲवॉर्ड मिळाल्याबद्दल आयइएस तर्फे प्रभू यांचा हृद्य सत्कार. याच सोसायटीच्या किंग जॉर्ज हायस्कूलमधून प्रभू १९५२ मध्ये शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले. शाळेच्या या गुणवंत माजी विद्यार्थ्याचा सपत्नीक सत्कार होत असताना पाहण्यासाठी प्रभू यांचे अनेक सहाध्यायी उपस्थित होते. सत्तरीच्या आत-बाहेर असलेल्या या माजी 'विद्यार्थ्यांचे' संमेलन अनोखे होते. प्रभू यांनी गोल्डमन सॅक्सच्या 'ब्रीक' रिपोर्टचा हवाला देत सांगितले की, पुढील दहा वर्षांत भारत इंग्लंडपेक्षा अधिक शक्तिशाली बनेल. २०२०मध्ये तो साऱ्या युरोपला मागे टाकेल. २०२५ मध्ये अमेरिका नंबर एक, चीन नंबर दोन आणि भारत तिसऱ्या क्रमांकावर राहील. २०३० मध्ये चीन प्रथम क्रमांकावर उडी घेईल आणि २०३५ मध्ये भारत अमेरिकेला मागे टाकून चीनच्या खालोखाल दुसरा नंबर पटकावेल. प्रभू यांच्या शब्दफेकीतील विश्वास सभागृहाला आश्वासित करणारा होता.

आपले जुने मित्र, सहाध्यायी, आजी माजी शिक्षक आणि प्रथितयश साहित्यिक यांच्या या स्नेहसंमेलनात बोलताना प्रभू जुन्या आठवणींत हरवून गेले. अनेक जुने मास्तर आणि मित्र यांच्या आठवणी त्यांनी रंगवल्या. एका एका मित्राचे नाव पुकारून त्यांना प्रेक्षागारातच उभे करत प्रभूंनी त्यांची सविस्तर ओळख साऱ्यांना करुन दिली.

सुप्रसिद्ध लेखिका व प्रभू यांच्या पत्नी डॉ. मीना प्रभू यावेळी उपस्थित होत्या.

संस्थेचे अध्यक्ष अरविंद वैद्य व विश्वस्त अचला जोशी व रमेश पाटकर यांची या प्रसंगी भाषणे झाली. प्रभू यांचा गौरव करताना 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक भारतकुमार राऊत यांनी सांगितले की, प्रभू यांच्यासारख्या गुणवंतांच्या बुद्धी व अनुभवाचा उपयोग भारताच्या विकासासाठी व्हायला हवा.